**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. ८**
**सभावृत्तांत**

दिनांक :- १६/११/२०१८

वेळ :- दुपारी १२.:३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक १६/११/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.करुणा शेखर चिंचवडे - अध्यक्ष
२. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
३. मा.संगिता राजेंद्र भोंडवे
४. मा.नामदेव जनार्दन ढाके
५. मा.सुरेश शिवाजी भोईर
६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
७. मा.उषा दिलीप काळे
८. मा.बिभीषण चौधरी, नामनिर्देशीत सदस्य
९. मा. देविदास पाटील , नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, मा.पंढरीनाथ गुंडाळ – प्र.प्रशासन अधिकारी, ब क्षेत्रीय कार्यालय , मा.रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.एकनाथ पाटील, कार्यकारी अभियंता, विदयुत विभा मा.अकबर शेख, उपअभियंता, विदयुत विभाग, मा.एच.पी.बन्सल, उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.राजेंद्र जावळे, उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.के.बी.पारोल, मुख्य आरोग्य निरिक्षक, ब क्षेत्रीय कार्यालय, ,मा.राजू कोतवाल – क्रिडा पर्यवेक्षक, क्रिडा विभाग, श्री.किशोर ढगे, अतिक्रमण निरिक्षक, अतिक्रमण मुख्य कार्यालय, श्री.आढळे, उदयान निरिक्षक, इत्यादी.

सर्वप्रथम मा.करुणा शेखर चिंचवडे अध्यक्षा यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मागील कार्यपत्रिका क्रमांक ६, दिनांक ४/९/२०१८, दिनांक ३/१०/२०१८ व कार्यपत्रिका क्रमांक ७ दिनांक ३/१०/२०१८ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे प्रकट केले.

त्यानंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने पुढे नमुद केल्याप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक ५ साईनगर मामुर्डी येथील चौकास व सोसायटीस नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.संगितीताई भोंडवे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ६ प्रभाग क्रमांक १६ किवळे रावेत या भागातील नामफलक तयार करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.प्रज्ञा खानोलकर यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ३१
दिनांक १६/११/२०१८
सुचक : मा.सुरेश भोईर

विषय क्र. १
विभाग - नगररचना विभाग
अनुमोदक: मा. नामदेव ढाके

संदर्भ :- मा.मोरेश्वर भोंडवे यांचा दिनांक ७/८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

मौजे-रावेत येथील शिंदे वस्ती येथील एम आय डी सी पार्पलाईन रस्ता स.नं.१८६ पासून पुर्वेकडे जाणारा डीपी रस्ता दक्षिणोत्तर १८.०० मी.रस्त्यास स.नं.१९१ मी पर्यंतचा रस्ता १८ मी रुंदीचा घोषीत केल्यास सदर ठिकाणी नागरी भाग असल्याने सदर रस्ता घोषीत केल्यास मिळकतधारकास मोबदला देता येणे मनपास शक्य होणार आहे. सबब मौजे-रावेत येथील शिंदे वस्ती येथील एम आय डी सी पार्पलाईन रस्ता स.नं.१८६ पासून पुर्वेकडे जाणारा डीपी रस्ता दक्षिणोत्तर १८ मी रस्त्यास स.नं.१९१ मी पर्यंतचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ अन्वये १८ मी रुंदीचा रस्ता घोषीत करणेकामीच्या प्रस्तावास व सदर रस्ता घोषीत करणेकामी विहीत कार्यवाही पुर्ण करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३२
दिनांक १६/११/२०१८
सुचक : मा.सुरेश भोईर

विषय क्र. २
विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.नामदेव ढाके

संदर्भ :- मा.शिवाजी भोईर यांचा दिनांक दिनांक ३०/८/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

स.नं.२६८ लक्ष्मीनगर पिंपरी लिंकरोड येथील जागा हि गावडे परिवाराची होती सदर जागेत महानगरपालिकेचे उदयानाचे आरक्षण असून महापालिकेने जागा ताब्यात घेतली आहे सदर जागेस उदयानासाठी आरक्षित असून नवीन करण्यात येणा-या उदयानाला कै.मुरलीधर पंडितराव गावडे असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३३
दिनांक १६/११/२०१८
सुचक : मा.संगिता राजेंद्र भोंडवे

विषय क्र. ३
विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.नामदेव जनार्दन ढाके

संदर्भ :-मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा यांचा दिनांक १०/९/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

आदर्शनगर किवळे येथे ३० वर्षापासून रहिवाशी असलेले व नेहमी समाजसेवेसाठी तत्पर असणारे सुनिल गणपत शिवणकर यांचे दिनांक १८/८/२०१८ रोजी आकस्मिक निधन झाले आहे येथील सर्व मंडळीच्या सकारात्मक विचाराने त्यांच्या स्मरणार्थ आदर्शनगर किवळे शेवटचा बस थांबा चौकाला कै.सुनिल गणपत शिवणकर यांचे नांव देण्याकामीचा प्रस्ताव मा.प्रभाग समितीपुढे मान्यतेकामी आला असता, सदरचा विषय तहकुब ठेवणेत येत आहे असे ठरले...

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३४

दिनांक १६/११/२०१८

सुचक : मा.नामदेव ढाके

विषय क्र. ४

विभाग - प्रशासन ब क्षेत्रीय कार्यालय

अनुमोदक: मा.सुरेश शिवाजी भोईर

संदर्भ :- बक्षे/प्रशा/३/कावि/१७२/२०१८ दिनांक २६/९/२०१८ रोजीचा मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव .

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेया कार्यक्षेत्रातील सर्व प्रभाग कार्यक्षेत्रातील हॉकर्स झोन पुन:स्थापीत करणेकामी मा.आयुक्त यांनी दिनांक २७/३/२०१८ रोजीच्या शहर फेरीवाला समिती सभेत दिलेल्या सुचनेनुसार ब प्रभागासाठी प्रभाग स्तरावर फेरीवाला उपसमिती गठण करण्यात आले असून, त्यात मा.क्षेत्रीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र व राज्यशासन तसेच मनपाने तयार केलेल्या धोरणानुसार ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रात हॉकर्स झोन उपसमिती मार्फत दिनांक २१/९/२०१८ रोजी कार्यक्षेत्राची पाहणी करुन हॉकर्स झोन स्थळांची निश्चीत करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही पुर्ण करण्यात आली आहे. उपसमितीने सोबत जोडणेत आलेले प्रपत्र नमुद केलेले स्थळाची निश्चिती योग्य आहे असे मान्य केलेले आहे निश्चित करणेत आलेल्या हॉकर्स झोन स्थळाची प्रपत्राप्रमाणे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३५

दिनांक १६/११/२०१८

सुचक : मा.संगिता राजेंद्र भोंडवे

विषय क्र. ५

विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

अनुमोदक: मा.सुरेश शिवाजी भोईर

संदर्भ :- मा.संगितताई भोंडवे यांचा दिनांक १६/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव .

प्रभाग क्रमांक १६ या कार्यक्षेत्रातील साईनगर मामुर्डी येथील चौकास व सोसायटीस पुढे नमुद केल्याप्रमाणे १) बीरबाब चौक – सर्व्हे नं.१७/१अ, २) चिंतामणी राऊत चौक – सर्व्हे नं.१७/१, ३) साई मंदिर चौक – सर्व्हे नं.१४/१, ४) मारुती भिमाजी राऊत कॉर्नर – सर्व्हे नं.१७/२, ५) चिंतामणी राऊत कॉलनी १ – स.नं.१७, ६) चिंतामणी राऊत कॉलनी २ – स.नं.१७, ७) नवरंग सोसायटी - सर्व्हे नं.१५ ८) शिवशक्ती सोसायटी – सर्व्हे नं.१४, ९) नवज्योत मित्रमंडळ चौक – सर्व्हे नं.१४/२, १०) जिजाबा खंडु राऊत चौक – सर्व्हे नं.१९, ११) कै.लक्ष्मण कोंडिबा राऊत चौक – सर्व्हे नं.२/१ असे नामफलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्र. ३६
दिनांक १६/११/२०१८
सुचक : मा.प्रज्ञा महेश खानोलकर

विषय क्र. ६
विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
अनुमोदक: मा.बिभीषण चौधरी

संदर्भ :- मा.प्रज्ञा महेश खानोलकर यांचा दिनांक १५/११/२०१८ रोजीचा प्रस्ताव .

प्रभाग क्रमांक १६ किवळे रावेत या भागातील पुढे नमुद केलेप्रमाणे १) सेंट जोसेफ चर्च, मिना कॉलनी , विकासनगर, २) मधुबन कॉलनी, विकासनगर, ३) श्री कॉलनी विकासनगर, ४) टी.सी.कॉलनी, विकासनगर, ५) पेडंसे कॉलनी, विकासनगर, ६) इंद्रप्रभा सोसायटी, विकासनगर, ७) विब्स पब्लिक स्कुल, विकासनगर, ८) मिना कॉलनी, विकासनगर, ९) इंदिरा कॉलनी विकासनगर, १०) सुविंग बिल्डींग, विकासनगर, ११) साई कॉलनी नं.४, ५, ६, ७,विकासनगर १२) सिध्दीविनायक कॉलनी नं.१ ते ८ ,विकास नगर १३) संत रोहिदास महाराज प्रतिष्ठान, विकासनगर,किवळे १४) बापदेवनगर कॉलनी नं.६, ७, ८, ९ १५) त्रिशुल चौक विकासनगर १६) त्रिशुल कॉलनी १, २, ३, ४, ५ १७) सेंट जोसेफ स्कुल, दत्तनगर १८) शिव प्रतिष्ठान कॉलनी दत्तनगर १९) दत्तात्रय कॉलनी १ व २ २०) सिध्दार्थनगर, मामुर्डी, २१) सहयाद्री कॉलनी, रावेत, २२) श्री छत्रपती संभाजी महाराज कॉलनी, संभाजीनगर, किवळे लेन नं.३ २३) श्री वासुदेवानंद सरस्वती दत्त मंदिर, दत्तनगर (भगवा कलर) २४) ह.भ.प.कै.तुकाराम विठोबा तरस चौक, तरसवस्ती, किवळे २५) किवळे - मुकाई चौक – विकासनगर (वाकड चौकाकडून येतांना दिशादर्शक बोर्ड बनविणे) २६) श्री मोरया प्रतिष्ठाण दत्तनगर २७) माळीवस्ती,सिध्दीविनायक कॉलनी, २८) रंजनीगंधा हौसिंग सोसायटी, वाल्हेकरवाडी २९) शिवाजी पार्क, वाल्हेकरवाडी ३०) अथर्व पार्क, वाल्हेकरवाडी ३१) स्वामी विवेकानंद पार्क, वाल्हेकरवाडी ३२) राजयोग कॉलनी, वाल्हेकरवाडी ३३) S.T.MARY S CHATHOLIC CHURCH, VIKASNAGAR , KIWLE (इंग्लिश बोर्ड बनविणे) ३४) पुढे शाळा आहे (६ बोर्ड बनविणे) ३५) एकता कॉलनी दत्तनगर, ३६) शिवनगर, आदर्शनगर, मामुर्डी ३७) शिवशंभो कॉलनी, गल्ली नं. १, २, ३, ४ आदर्शनगर किवळे ३९) श्री गजानन कॉलनी, विकासनगर ४०) छत्रपती शाहु महाराज कॉलनी असे बोर्ड बनविण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला

---------------------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा.करुणा शेखर चिंचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणा शेखर चिंचवडे]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/९१८/२०१८.
दिनांक : ७ / १२ /२०१८

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना